**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका छत्रपती संभाजीनगर**
**निवडणूक विभाग**
**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025**
**आरक्षण सोडत कार्यक्रम**
**दिनांक : 11/11/2025 वार : मंगळवार सकाळी 11.00 वाजता**

स्थळ : - डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, सभागृह, छत्रपती संभाजीनगर.

**सोडत काढण्याकरिता मार्गदर्शक सूचना**

**संदर्भ** : 1. राज्य शासनाच्या नगर विभागाने अधिसूचना दि. 20 मे 2025

2. मा.राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रं.रानिआ/मनपा-2025/प्र.क्र.43/का-5 दि.24ऑक्टोबर 2025

वरील संदर्भानुसार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-2025 च्या अनुषंगाने प्रभाग रचना व आरक्षण बाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे सोडत काढण्यात येणार आहे.

## अ. आरक्षित प्रभाग निश्चित करणे

**1. अनुसूचित जातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :**

संदर्भ 2 मधील परिशिष्ट 1 नुसार अनुसूचित जातीकरीता राखुन ठेवावयाच्या एकुण जागांची गणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात आलेली आहे.

$$\left( \text{अनुसूचित जातीकरिता राखून ठेवायच्या जागा} = \frac{\text{अनुसुचित जातीची लोकसंख्या}}{\text{एकुण लोकसंख्या}} \times \text{एकुण सदस्य संख्या} \right)$$

या सुत्रानुसार 22 जागा अनुसूचित जातीकरिता आरक्षित करण्यात आल्या. संदर्भ क्र.01 नियम 3 नुसार प्रभागातील अनुसुचित जातीच्या लोकसंख्येची प्रभागाच्या एकुण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासुन सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी परिशिष्ट 2 नुसार करण्यात आली. त्यानंतर उतरत्या क्रमाने अनुसुचित जातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल. त्यानुसार एकुण 29 बहुसदस्यीय प्रभागांपैकी 22 प्रभागातील प्रत्येकी एक जागा अनुसुचित जातीकरीता आरक्षित करण्यात आली आहे.

**2. अनुसूचित जमातीकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे. :**

संदर्भ 2 मधील परिशिष्ट 1 नुसार अनुसूचित जमातीकरीता राखुन ठेवावयाच्या एकुण जागांची गणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात आलेली आहे.

$$\left( \text{अनुसूचित जमातीकरीता राखून ठेवायच्या जागा} = \frac{\text{अनुसूचित जमातीची लोकसंख्या}}{\text{एकुण लोकसंख्या}} \times \text{एकुण सदस्य संख्या} \right)$$

या सुत्रानुसार 2 जागा अनुसूचित जमातीकरिता आरक्षित करण्यात आल्या. संदर्भ क्र.01 नियम 4 नुसार प्रभागातील अनुसुचित जमातीच्या लोकसंख्येची प्रभागाच्या एकुण लोकसंख्येशी असलेली टक्केवारी ज्या प्रभागात सर्वाधिक असेल, त्या प्रभागापासुन सुरुवात करुन उतरत्या क्रमाने सर्व प्रभागांची मांडणी परिशिष्ट 3 नुसार करण्यात आली. त्यानंतर उतरत्या क्रमाने अनुसुचित जमातीसाठी निश्चित केलेल्या संख्येइतक्या प्रभागात अनुसूचित जमातीची प्रत्येकी एक जागा वाटप करण्यात येईल. त्यानुसार एकुण 29 बहुसदस्यीय प्रभागांपैकी 2 प्रभागातील प्रत्येकी एक जागा अनुसुचित जमातीकरीता आरक्षित करण्यात आली आहे.

**3. नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे. :**

1. संदर्भ क्र.02 परिशिष्ट 1 नुसार नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखुन ठेवावयाच्या एकुण जागांची गणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात आलेली आहे.

$$\left( \text{नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता राखुन ठेवावयाच्या एकुण जागा} = \frac{27}{100} \times \text{एकुण सदस्य संख्या} \right)$$

या सुत्रानुसार एकुण पालिका सदस्य संख्येपैकी 31 जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता राखीव ठेवण्यात आल्या आहे.

2. संदर्भ क्र.01 नियम 5 नुसार प्रथम प्रत्येक प्रभागाकरीता एक जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता नेमुन देण्यात येईल. अशारितीने नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गामधील एकुण 29 जागा प्रत्येक प्रभागात एक यानुसार नेमुन देण्यात आल्या आहे.

3. याप्रमाणे प्रत्येक प्रभागात एक जागा वाटप केल्यानंतर नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या एकुण 31 जागापैकी दोन जागा शिल्लक राहतील. त्यामुळे संदर्भ 01 च्या नियम 5 खंड (ब) उपखंड (दोन) नुसार ज्या प्रभागातील किमान तीन जागा बिनराखीव आहे त्या प्रभागांमधुन उर्वरित दोन जागा सोडतीने नेमुन देण्यात येईल. यानुसार प्रभाग क्र. 6, 10, 11, 12, 13, 14, 16 या प्रभागातील किमान तीन जागा बिनराखीव असल्याने या प्रभागांतून नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या उर्वरित दोन जागा सोडतीने निश्चित करण्यात येतील.

**ब. स्त्रियांकरिता जागा आरक्षित करणे**

संदर्भ क्र.02 परिशिष्ट 1 नुसार स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागांची गणना खालील सूत्राप्रमाणे करण्यात आलेली आहे.

$$\left( \text{स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागा} = \frac{\text{एकुण सदस्य संख्या}}{2} \right)$$

या सुत्रानुसार एकुण पालिका सदस्य संख्येपैकी 58 जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात येतील.

4. **अनुसूचित जाती स्त्रियांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे. :**

$$\left( \text{अनुसूचित जाती स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागा} = \frac{\text{अनुसूचित जातींची आरक्षित सदस्य संख्या}}{2} \right)$$

या सुत्रानुसार अनुसूचित जातीतील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या 11 जागा या अनुसूचित जातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

5. **अनुसूचित जमाती स्त्रियांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे. :**

$$\left( \text{अनुसूचित जमाती स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागा} = \frac{\text{अनुसूचित जमातींची आरक्षित सदस्य संख्या}}{2} \right)$$

या सुत्रानुसार अनुसूचित जमातीतील स्त्रियांसाठी राखून ठेवावयाची 1 जागा ही अनुसूचित जमातीसाठी राखीव जागा असलेल्या प्रभागांमधून सोडतीने नेमून देण्यात येतील.

6. **नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्रियांकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे. :**

   **संदर्भ क्र. 1 नियम 6 नुसार**

   1. प्रथम ज्या प्रवर्गामध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरीता दोन जागा राखीव असतील त्या प्रभागामधील एक जागा थेट नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता राखून ठेवण्यात येईल.
   2. त्यानंतर, ज्या प्रभागांमध्ये एक किंवा अधिक जागा एकतर अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा दोन्हीकरीता राखीव असतील, परंतु त्या जागा, त्या प्रवर्गातील स्त्रियांकरीता राखीव नसतील तर, अशा प्रभागांतील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची जागा स्त्रियांकरिता राखून ठेवण्यात येईल.
   3. उपरोक्त 1 व 2 नुसार आरक्षित होणारे प्रभाग आणि ज्या प्रभागांमध्ये स्त्रियांच्या आरक्षणासाठी विहित केलेल्या संख्यात्मक मर्यादेपर्यंत स्त्रियांसाठी अगोदरच जागा राखीव असतील असे प्रभाग वगळुन उर्वरित प्रभागांतून शिल्लक जागा सोडतीने नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग स्त्रियांसाठी निश्चित केल्या जातील.

7. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गातील स्त्रियांकरिता समुचित प्रभागांमध्ये जागा राखून ठेवण्यात आल्यानंतर, स्त्रियांकरिता राखीव असलेल्या उर्वरित जागा, ज्या प्रभागांमध्ये स्त्रियांचे आरक्षण पूर्ण करण्याकरीता आवश्यक असतील त्या मर्यादेपर्यंत नेमून देण्यात येतील.

| | | |
|---|---|---|
| उपआयुक्त-1 | अतिरिक्त आयुक्त-1 | आयुक्त |
| छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका | छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका |

# परिशिष्ट-1
## (सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना)

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक 2025

1. महानगरपालिका क्षेत्राची एकुण लोकसंख्या - 1228032
   (लगतच्या जनगणनेनुसार)
2. अनुसुचित जातीची लोकसंख्या - 238105
   (लगतच्या जनगणनेनुसार)
3. अनुसुचित जमातीची लोकसंख्या - 16320
   (लगतच्या जनगणनेनुसार)
4. निवडुन द्यावयाच्या महानगरपालिका सदस्यांची संख्या - 115
5. अनुसुचित जातीकरीता राखुन ठेवावयाच्या एकुण जागा - 22
   (स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा धरुन )

$$\frac{238105}{1228032} \text{ X } 115 = 22.29 = 22$$

टीप : अनुसुचित जातीकरीता राखुन ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना 0.50 व त्यापेक्षा अधिक असलेला अपुर्णाक संख्येस पुर्णांकित करण्यात यावा.

6. अनुसुचित जमातीकरीता राखुन ठेवावयाच्या एकुण जागा - 02
   (स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा धरुन )

$$\frac{16320}{1228032} \text{ X } 115 = 1.52 = 02$$

टीप : अनुसुचित जमातीकरीता राखुन ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना 0.50 व त्यापेक्षा अधिक असलेला अपुर्णाक संख्येस पुर्णांकित करण्यात यावा.

7. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखुन ठेवावयाच्या एकुण जागा - 31
   (स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागा धरुन )

$$\frac{27}{100} \text{ X } 115 = 31.05 = 31$$

टीप : नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखुन ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना अपुर्णाक आल्यास तो दुर्लक्षित करण्यात यावा.

8. अ) स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागा : -- 58

$$\frac{115}{2} = 57.50 = 58$$

ब) स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या एकुण जागांची विभागणी

1. अनुसुचित जातीच्या स्त्रियांसाठी -- 11

$$\frac{22}{2} = 11$$

2. अनुसुचित जमातीच्या स्त्रियांसाठी -- 01

$$\frac{02}{2} = 01$$

3. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी -- 16

$$\frac{31}{2} = 15.50 = 16$$

4. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणाऱ्या उर्वरित जागा -- 30

$$58 - (11+01+16) = 30$$

टीप : स्त्रियांसाठी राखुन ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना 0.50 व त्यापेक्षा अधिक असलेला पुर्णांक पुढील संख्येस पुर्णांकित करण्यात यावा.

अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती करिता एकच जागा देय असल्यास स्त्रियांचे आरक्षण निश्चित करतांना आदेशातील मुद्या क्र.7 नुसार गणना करावी.

9. अराखीव -

$$115 - (22+02+31+30) = 30$$

आयुक्त
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

| परिशिष्ट **2** (अनुसूचित जातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **CHHATRAPATI SAMBHAJINAGAR MUNICIPAL CORPORATION** | | | | | | |
| **STATEMENT SHOWING SCHEDULE CASTE DESCENDING ORDER** | | | | | | |
| Sr.No. | Prabhag No. | Total | S.C. | S.T. | S.C.% | RESVN |
| 1 | 24 | 45688 | 19383 | 412 | 42.42 | S.C. |
| 2 | 9 | 39679 | 16702 | 255 | 42.09 | S.C. |
| 3 | 28 | 46420 | 17757 | 427 | 38.25 | S.C. |
| 4 | 4 | 45140 | 14390 | 1055 | 31.88 | S.C. |
| 5 | 3 | 43062 | 13554 | 785 | 31.48 | S.C. |
| 6 | 8 | 41403 | 12723 | 819 | 30.73 | S.C. |
| 7 | 18 | 38746 | 10690 | 724 | 27.59 | S.C. |
| 8 | 1 | 41080 | 9534 | 1295 | 23.21 | S.C. |
| 9 | 29 | 34534 | 7352 | 566 | 21.29 | S.C. |
| 10 | 20 | 44675 | 9366 | 423 | 20.96 | S.C. |
| 11 | 26 | 41377 | 8556 | 901 | 20.68 | S.C. |
| 12 | 25 | 39847 | 7962 | 481 | 19.98 | S.C. |
| 13 | 5 | 45188 | 8636 | 1038 | 19.11 | S.C. |
| 14 | 19 | 39092 | 7450 | 304 | 19.06 | S.C. |
| 15 | 17 | 38084 | 6510 | 487 | 17.09 | S.C. |
| 16 | 7 | 38947 | 6515 | 627 | 16.73 | S.C. |
| 17 | 27 | 46350 | 7299 | 501 | 15.75 | S.C. |
| 18 | 2 | 39937 | 6249 | 658 | 15.65 | S.C. |
| 19 | 22 | 46906 | 7199 | 554 | 15.35 | S.C. |
| 20 | 15 | 41796 | 6003 | 451 | 14.36 | S.C. |
| 21 | 21 | 41452 | 5903 | 423 | 14.24 | S.C. |
| 22 | 23 | 46364 | 6437 | 358 | 13.88 | S.C. |
| 23 | 11 | 38979 | 5090 | 547 | 13.06 | |
| 24 | 10 | 40233 | 5215 | 642 | 12.96 | |
| 25 | 16 | 43116 | 4493 | 381 | 10.42 | |
| 26 | 6 | 44429 | 3849 | 388 | 8.66 | |
| 27 | 14 | 45014 | 2320 | 555 | 5.15 | |
| 28 | 13 | 46600 | 867 | 206 | 1.86 | |
| 29 | 12 | 43894 | 101 | 57 | 0.23 | |
| | **Total** | **1228032** | **238105** | **16320** | | |

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

| परिशिष्ट 3 (अनुसूचित जमातीचा प्रभागनिहाय उतरता क्रम) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| CHHATRPATI SAMBHAJINAGAR MUNICIPAL CORPORATION | | | | | | |
| STATEMENT SHOWING SCHEDULE CASTE DESCENDING ORDER | | | | | | |
| Sr.No. | Ward No. | Total | S.C. | S.T. | S.T.% | RESVN |
| 1 | 1 | 41080 | 9534 | 1295 | 3.15 | S.T. |
| 2 | 4 | 45140 | 14390 | 1055 | 2.34 | S.T. |
| 3 | 5 | 45188 | 8636 | 1038 | 2.30 | |
| 4 | 26 | 41377 | 8556 | 901 | 2.18 | |
| 5 | 8 | 41403 | 12723 | 819 | 1.98 | |
| 6 | 18 | 38746 | 10690 | 724 | 1.87 | |
| 7 | 3 | 43062 | 13554 | 785 | 1.82 | |
| 8 | 2 | 39937 | 6249 | 658 | 1.65 | |
| 9 | 29 | 34534 | 7352 | 566 | 1.64 | |
| 10 | 7 | 38947 | 6515 | 627 | 1.61 | |
| 11 | 10 | 40233 | 5215 | 642 | 1.60 | |
| 12 | 11 | 38979 | 5090 | 547 | 1.40 | |
| 13 | 17 | 38084 | 6510 | 487 | 1.28 | |
| 14 | 14 | 45014 | 2320 | 555 | 1.23 | |
| 15 | 25 | 39847 | 7962 | 481 | 1.21 | |
| 16 | 22 | 46906 | 7199 | 554 | 1.18 | |
| 17 | 27 | 46350 | 7299 | 501 | 1.08 | |
| 18 | 15 | 41796 | 6003 | 451 | 1.08 | |
| 19 | 21 | 41452 | 5903 | 423 | 1.02 | |
| 20 | 20 | 44675 | 9366 | 423 | 0.95 | |
| 21 | 28 | 46420 | 17757 | 427 | 0.92 | |
| 22 | 24 | 45688 | 19383 | 412 | 0.90 | |
| 23 | 16 | 43116 | 4493 | 381 | 0.88 | |
| 24 | 6 | 44429 | 3849 | 388 | 0.87 | |
| 25 | 19 | 39092 | 7450 | 304 | 0.78 | |
| 26 | 23 | 46364 | 6437 | 358 | 0.77 | |
| 27 | 9 | 39679 | 16702 | 255 | 0.64 | |
| 28 | 13 | 46600 | 867 | 206 | 0.44 | |
| 29 | 12 | 43894 | 101 | 57 | 0.13 | |
| | **Total** | **1228032** | **238105** | **16320** | | |

आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका